महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ Email ID : directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./१८७६/IEC/२०२१ दिनांक:-२५/०३/२०२१

प्रति,

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय:- "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या जाहीरात प्रसार व प्रसिध्दी बाबत.**

संदर्भ:- १) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णयक्र.प्रआयो-२०२०/ प्र.क्र.१०७/योजना-१०, दिनांक १९/११/२०२०

२) राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अभियान अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना दि. २०/११/२०२०

३) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णयक्र.प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दिनांक २५/०२/२०२१

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व ३ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी दि.२० नोव्हेंबर, २०२० पासुन "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्यात येत आहे. दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजी "महा आवास अभियान-ग्रामीण" चा शुभारंभ मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते, मा. मंत्री, ग्राम विकास व मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांचे उपस्थितीत संपन्न झाला. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनान्वये अभियान कालावधीत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जनजागृती, प्रसार व प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व सवांद (IEC) उपक्रमांचा वापर करणे बाबत कळविण्यात आले आहे.

अभियानाची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दी करण्याकरीता या कार्यालयाने महा आवास अभियान-ग्रामीणची प्रसिध्दी करणाऱ्या व्हिडीओ व ऑडीओ जाहिरातीची निर्मिती केली आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१. असावा सुंदर चॉकलेटचा बंगला – ५४ सेकंद

Scanned with CamScanner

२. सरपंच-काय रं शिरप्या - ५५ सेकंद

३. धनी.. माझ्या बा ला तुम्ही वचन दिलय म्हणे - ५५ सेकंद

४. संवादरहीत जाहिरात - ५९ सेकंद

५. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे आवाहन - २५ सेकंद

राज्य स्तरावरुन दुरदर्शन, विविध मराठी वृत्त वाहिन्या,आकाशवाणी, विविध एफ एम चॅनल्स व राज्य परिवहन महामार्ग बस स्थानकावरुन या जाहिराती प्रसारीत करण्यात येत आहेत. आपले स्तरावरुन सदर व्हिडीओ व ऑडीओ जाहिरातींचा वापर जिल्हास्तर, तालुकास्तर व गावस्तरावर पुढील प्रमाणे करण्यात यावा.

१. अभियानाच्या उपरोक्त व्हिडीओ व ऑडीओ जाहिराती जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील सर्व केबल टि.व्ही. वर शासनाच्या मनोरंजन विभागाच्या मदतीने विनामुल्य प्रदर्शित करण्यात याव्यात.

२. अभियानाच्या उपरोक्त ऑडीओ जाहिराती जिल्हयातील कम्युनिटी रेडीओ वरुन विनामुल्य प्रदर्शित करण्यात याव्यात.

३. तालुका व ग्रामस्तरावरील घंटा गाडीच्या (कचरा गोळा करणारी यंत्रणा) माध्यमातून तसेच ग्रामपंचायती मध्ये उपलब्ध असलेल्या पब्लिक अनाऊन्समेंट (लाऊड स्पीकर) सिस्टीमव्दारे अभियानाच्या ऑडीओ जाहिरातींना विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

४. विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर होणाऱ्या आढावा बैठका, कार्यशाळा, लाभार्थी मेळावे, व्हिडीओ कॉन्फरन्स इत्यादी उपक्रमांत अभियानाच्या या व्हिडीओ व ऑडीओ जाहिराती फिल्मशोव्दारे विनामुल्य दाखविण्यात याव्यात.

५. अन्य नाविन्यपुर्ण मार्गाने या जाहिरातींचा उपयोग करण्यात यावा. उदा. सोशल मिडीया इ.

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कृपया या कार्यालयात पाठविण्यात यावा.

सोबत :- अभियान व्हिडीओ व ऑडीओ जाहिराती

**(डॉ.राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

**प्रत:-** **१.** मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.

३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकाय यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

Scanned with CamScanner